नोंदणी क्रं. RNI. MAHMAR/2023/84162
Registration No. MAHMAR/2023/84162

दैनिक

# यश सिद्धि न्यूज

संपादक : कमलाकर सोनकांबळे

YASH SIDDHI NEWS

वर्ष - ४ रे Year - 4rd | अंक - ६४ Issue - 64 | वार - मंगळवार दि. २८ जुलै २०२६ Blow- Tuesday Date 28 JULLY 2026 | ई-पेपर - https://epaper. yashsiddhinews.com वेब पोर्टल - www.yashsiddhinews.com | पाने - ४ Pages - 4 | किंमत - ४.०० रुपये Amount - 4 /- Rs | पोस्टल परवाना : SLP/298/2024-2026 ई-मेल आयडी yashsiddhinews@ gmail.com

# संसदेत परीक्षा सुधारणा विधेयक सादर

## विरोधकांच्या गदारोळात लोकसभा-राज्यसभेचे कामकाज तहकूब



**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

नवी दिल्ली : देशभरात गाजलेल्या नीट पेपरफुटी प्रकरणाच्या पार्श्वभूमीवर केंद्र सरकारने सार्वजनिक परीक्षा प्रणाली अधिक पारदर्शक आणि सुरक्षित करण्यासाठी 'सार्वजनिक परीक्षा सुधारणा विधेयक' लोकसभेत सादर केले.

मात्र, विधेयक सादर होताच विरोधकांनी सरकारविरोधात जोरदार घोषणाबाजी करत आक्रमक भूमिका घेतल्याने लोकसभा आणि राज्यसभेचे कामकाज वारंवार तहकूब करावे लागले.

केंद्रीय मंत्री जितेंद्र सिंह यांनी लोकसभेत हे विधेयक मांडले. देशभरातील स्पर्धा परीक्षा आणि भरती प्रक्रियेत होणाऱ्या पेपरफुटीच्या घटनांवर आळा घालण्यासाठी या विधेयकात कठोर तरतुदी करण्यात आल्या आहेत. विधेयकानुसार, पेपरफुटीत सहभागी असलेल्या आरोपींना १० वर्षांपर्यंत कारावास आणि १० कोटी रुपयांपर्यंत दंड होऊ शकतो.

तसेच परीक्षा प्रक्रियेत गैरव्यवहार करणाऱ्या सेवा पुरवठादार कंपन्यांना आठ वर्षांसाठी काळ्या यादीत (ब्लॅकलिस्ट) टाकण्याची तरतूदही करण्यात आली आहे.

विरोधकांचा सरकारवर जोरदार हल्लाबोल :

विधेयक सादर करण्यापूर्वीच विरोधकांनी नीट पेपरफुटी, विद्यार्थ्यांवरील लाठीचार्ज आणि इतर मुद्द्यांवरून सरकारला लक्ष्य केले. इंडिया आघाडीच्या खासदारांनी सभागृहात घोषणाबाजी करत सरकारविरोधात तीव्र निषेध नोंदवला. गोंधळ वाढल्याने लोकसभा आणि राज्यसभेचे कामकाज प्रथम दुपारी १२ वाजेपर्यंत, त्यानंतर पुन्हा दुपारी २ वाजेपर्यंत तहकूब करण्यात आले.

संसद परिसरातही निदर्शने :


सभागृहाचे कामकाज तहकूब झाल्यानंतर विरोधी पक्षांच्या खासदारांनी संसद परिसरात निदर्शने केली. यावेळी विविध मुद्द्यांवर सरकारविरोधी घोषणा देत फलक आणि बॅनर झळकावण्यात आले. राज्यसभेत विरोधी पक्षनेते मल्लिकार्जुन खर्गे यांनी पेपरफुटीचा मुद्दा उपस्थित करत सरकारकडे उत्तर मागितले. त्यानंतरही सभागृहात गदारोळ सुरू राहिल्याने कामकाज तहकूब करण्यात आले.

'विधेयकावर चर्चा व्हावी' - ओम बिर्ला

दुपारच्या सत्रात गोंधळ सुरू असतानाच केंद्रीय मंत्री जितेंद्र सिंह यांनी परीक्षा सुधारणा विधेयक सभागृहात मांडले. मात्र विरोधकांच्या घोषणाबाजीमुळे त्यावर सविस्तर चर्चा होऊ शकली नाही. लोकसभा अध्यक्ष ओम बिर्ला यांनी सर्व पक्षांना शांततेत चर्चा करण्याचे आवाहन करत, अशा महत्त्वाच्या विधेयकावर सभागृहात सखोल चर्चा होणे आवश्यक आहे, असे मत व्यक्त केले.

## ४ ऑगस्टच्या यादीला ब्रेक; ग्रामपंचायत निवडणुका पुन्हा लांबणीवर

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**



मुंबई : मुदत संपलेल्या ग्राम पंचायतींमध्ये प्रशासकीय राजवट संपून लवकरच लोकनियुक्त प्रतिनिधी येणार या आशेवर असलेल्यांच्या पदरी पुन्हा एकदा निराश आली आहे. राज्य निवडणूक आयोगाने ४ ऑगस्ट रोजी प्रसिद्ध होणाऱ्या अंतिम मतदार यादीला ऐनवेळी स्थगिती दिल्याने आगामी

### राज्य निवडणूक आयोगाचा निर्णय

ग्रामपंचायत निवडणुका पुन्हा लांबणीवर पडल्या आहेत. राज्यात सध्या सुरू असलेल्या मतदार याद्यांच्या विशेष संक्षिप्त पुनरीक्षण (एसआयआर) मोहिमेमुळे आयोगाने हा निर्णय घेतला असून, ऑगस्टच्या पहिल्या पंधरवड्यात निवडणूक कार्यक्रम जाहीर होण्याच्या शक्यतांवर आता पाणी फिरले आहे. यापूर्वीच्या नियोजित वेळापत्रकानुसार ४ ऑगस्ट रोजी अंतिम मतदार यादी प्रसिद्ध होऊन लगेचच निवडणुकीचे बिगुल वाजणार होते. या पार्श्वभूमीवर गावागावांत इच्छुक उमेदवारांनी बैठका, कॉर्नर सभा, मतदार संपर्क आणि पॅनेल बांधणीच्या हालचाली तीव्र केल्या होत्या. मात्र, मतदार याद्या दोषमुक्त आणि पारदर्शक करण्यासाठी सध्या राबवण्यात येत असलेली 'एसआयआर' मोहीम पूर्ण झाल्यानंतरच अद्ययावत विधानसभा मतदारसंघ निहाय यादी ग्रामपंचायत निवडणुकीसाठी वापरली जावी, अशी विनंती निवडणूक आयोगाकडे करण्यात आली होती. आयोगाने ४ ऑगस्टच्या प्रसिद्धीला दिलेल्या स्थगितीमुळे सुमारे ७५४ ग्राम पंचायतींसह राज्यातील मुदत संपलेल्या सर्वच ग्रामपंचायतींची निवडणूक प्रक्रिया काही काळासाठी पुढे ढकलली गेली आहे. मात्र, या निर्णयामुळे मतदार यादीतील मयत, दुबार, स्थलांतरित आणि बोगस मतदारांची नावे वगळून पूर्णपणे अद्ययावत व पारदर्शक यादी हाती येण्याचा मार्ग मोकळा झाला आहे.

यामुळे ग्रामीण भागातील राजकीय गणिते आणि मतांची जुळवाजुळव पूर्णपणे बदलणार आहे. अंतिम मतदार यादी जाहीर झाल्यानंतर उमेदवारी अर्ज स्वीकारणे, छाननी, चिन्ह वाटप आणि प्रत्यक्ष मतदानाची प्रक्रिया पार पडणार होती. आचारसंहिता लागू होण्यापूर्वी विकासकामांच्या भूमिपूजनांचा धडाका सुरू असतानाच आता या निर्णयामुळे स्थानिक पातळीवरील राजकीय वातावरण पुन्हा 'वेट अँड वॉच' मोडवर गेले आहे. अतिवृष्टी आणि सणासुदीच्या काळासोबतच आता 'एसआयआर' मोहिमेची भर पडल्याने, नवीन अद्ययावत मतदार यादी प्रसिद्ध झाल्यानंतरच राज्य निवडणूक आयोग निवडणुकांचे नवे वेळापत्रक जाहीर करणार असल्याचे स्पष्ट झाले आहे.

## आता ₹१० आणि ₹२० च्या प्लास्टिक नोटा येणार? केंद्र सरकारची मोठी घोषणा; आरबीआय चाचणीला हिरवा कंदील

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**



मुंबई : भारतीय चलन व्यवस्थेत मोठा बदल होण्याची शक्यता आहे. ₹१० आणि ₹२० च्या प्लास्टिक (पॉलिमर) नोटांच्या चाचणीसाठी केंद्र सरकारने भारतीय रिझर्व्ह बँकेच्या प्रस्तावाला मंजुरी दिली आहे. सुरुवातीला प्रत्येकी १०० कोटी (१ अब्ज) प्लास्टिक नोटा प्रायोगिक तत्त्वावर चलनात आणल्या जाणार असून, या नोटांची भारतीय हवामान आणि वापराच्या परिस्थितीत कार्यक्षमता तपासली जाणार आहे.

अर्थ राज्यमंत्री पंकज चौधरी यांनी लोकसभेत लेखी उत्तराद्वारे ही माहिती दिली. ठइख ने पॉलिमर नोटांचा पायलट प्रकल्प राबवण्याचा प्रस्ताव दिला असून, चाचणी यशस्वी झाल्यानंतरच देशभरात त्यांचा व्यापक वापर करण्याबाबत निर्णय घेतला जाईल.

ठइख च्या मते, पॉलिमर नोटा पारंपरिक कागदी नोटांच्या तुलनेत अधिक टिकाऊ असतात. त्या लवकर फाटत नाहीत, ओलावा आणि घाण यांचा कमी परिणाम होतो तसेच बनावट नोटा तयार करणेही अधिक कठीण ठरते. त्यामुळे ज्या देशांमध्ये रोख व्यवहारांचे प्रमाण जास्त आहे, तेथे पॉलिमर नोटा अधिक प्रभावी मानल्या जातात.

सरकारने याबाबत स्पष्ट केले आहे की, कागदी नोटा बंद करण्याचा कोणताही प्रस्ताव सध्या विचाराधीन नाही. पॉलिमर नोटा या विद्यमान कागदी नोटांसोबतच चलनात राहतील. त्यामुळे नागरिकांनी कागदी नोटा बंद होणार असल्याच्या अफवांवर विश्वास ठेवू नये.

ठइख ने सांगितले की, प्लास्टिक नोटांचा डिजिटल व्यवहारांवर काय परिणाम होईल, याबाबत सध्या कोणताही निष्कर्ष काढणे शक्य नाही. नोटा प्रत्यक्ष चलनात आल्यानंतरच त्याचा अभ्यास केला जाईल. केंद्रीय बँकेने स्पष्ट केले की, रोख व्यवहार आणि डिजिटल पेमेंट हे एकमेकांचे पर्याय नसून पूरक माध्यम आहेत. भविष्यातही दोन्ही प्रणाली एकत्रितपणे कार्यरत राहतील.

## ऑनलाईन शेअर ट्रेडिंग फसवणूक : प्रमुख बँकांना सुप्रीम कोर्टाची नोटीस; सर्वोच्च न्यायालयामुळे लाखो गुंतवणूकदारांच्या आशा पल्लवित

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

नवी दिल्ली : ऑनलाईन शेअर ट्रेडिंग आणि डिजिटल इन्व्हेस्टमेंटच्या नावाखाली देशभरात कोट्यवधी रुपयांची फसवणूक झालेल्या गुंतवणूकदारांना ग्राहक आयोगामार्फत न्याय मिळू शकतो का, या महत्त्वपूर्ण कायदेशीर प्रश्नावर सर्वोच्च न्यायालयाने देशातील प्रमुख बँकांना नोटीस बजावली आहे. या आदेशामुळे ऑनलाईन आर्थिक फसवणुकीच्या हजारो पीडितांना मोठा दिलासा मिळण्याची शक्यता निर्माण झाली आहे. या प्रकरणाची पुढील सुनावणी ३ सप्टेंबर रोजी होणार आहे. हे प्रकरण एका गुंतवणूकदाराशी संबंधित असून, व्हॉट्सप ग्रुप, बनावट ट्रेडिंग प्स आणि अवास्तव नफ्याचे आमिष दाखवून त्यांची तब्बल २ कोटी ८९ लाखांची फसवणूक करण्यात आली.

गुंतवणूकदाराचा विश्वास संपादन करण्यासाठी बनावट वेबसाईटवर एनएसईचे कथित रिअल टाईम शेअर बाजार दर दाखवण्यात आले. सुरुवातीला काही प्रमाणात नफा खात्यात जमा करून विश्वास निर्माण करण्यात आला. मात्र, संपूर्ण गुंतवणूक केल्यानंतर पैसे परत मागितल्यावर आणखी रकमेची मागणी करण्यात आली आणि फसवणूक झाल्याचे स्पष्ट झाले.

या घटनेनंतर पीडिताने राष्ट्रीय ग्राहक तक्रार निवारण आयोगात धाव घेतली. तक्रारीत बँकांवर गंभीर निष्काळजीपणाचा आरोप करण्यात आला. अल्पावधीत कोट्यवधी रुपयांचे संशयास्पद व्यवहार होत असतानाही रिझर्व्ह बँकेच्या 'केवायसी' आणि मनी लॉन्डरिंग प्रतिबंधक नियमांचे प्रभावी पालन करण्यात बँका अपयशी ठरल्याचा दावा करण्यात आला.

मात्र, राष्ट्रीय ग्राहक आयोगाने ही तक्रार फेटाळून लावत शेअर बाजारातील गुंतवणूक ही व्यावसायिक स्वरूपाची असल्याने अशा तक्रारी ग्राहक संरक्षण कायद्यांतर्गत ग्राह्य धरता येणार नाहीत, असे निरीक्षण नोंदवले होते. या निर्णयाला आव्हान देत पीडिताने सर्वोच्च न्यायालयात अपील दाखल केले.

तक्रारदाराच्या वतीने ॲड. महेंद्र लिमये आणि ॲड. आलोक शर्मा यांनी सर्वोच्च न्यायालयात महत्त्वपूर्ण युक्तिवाद केला. त्यांनी शेअर बाजारातील प्रत्येक गुंतवणूक ही केवळ व्यावसायिक नफ्यासाठी नसून, अनेक नागरिक भविष्याची आर्थिक सुरक्षितता किंवा उपजीविकेसाठीही गुंतवणूक करतात, असे न्यायालयाच्या निदर्शनास आणून दिले. तसेच, फसवणुकीची रक्कम 'मनी म्युल' खात्यांमध्ये वळवली जात असताना बँकांनी आरबीआयच्या मार्गदर्शक तत्त्वांचे पालन करण्यात गंभीर हलगर्जीपणा केल्याचा मुद्दाही त्यांनी मांडला. यापूर्वी 'डिजिटल अरेस्ट' फसवणूक प्रकरणात राष्ट्रीय ग्राहक आयोगाने बँकांना नोटीस बजावली असताना या प्रकरणात वेगळा दृष्टिकोन का, असा सवालही करण्यात आला.

सर्वोच्च न्यायालयाचा अंतिम निर्णय तक्रारदाराच्या बाजूने लागल्यास ऑनलाईन शेअर ट्रेडिंग, डिजिटल इन्व्हेस्टमेंट आणि सायबर आर्थिक फसवणुकीचे बळी ठरलेल्या देशभरातील हजारो गुंतवणूकदारांना ग्राहक आयोगाच्या माध्यमातून बँकांकडून भरपाई मागण्याचा मार्ग खुला होण्याची शक्यता कायदेतज्ज्ञांनी व्यक्त केली आहे. त्यामुळे या प्रकरणाकडे आर्थिक क्षेत्रासह बँकिंग आणि ग्राहक हक्कांशी संबंधित सर्व घटकांचे लक्ष लागले आहे.

**पाच जिल्ह्यांना ऑरेंज अलर्ट, हवामान विभागाचा ताजा अंदाज**

## राज्यात विजांच्या कडकडाटासह पाऊस बरसणार

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**



मुंबई: राज्यातील विविध जिल्ह्यांमध्ये मागील काही दिवसांपासून संततधार पावसाने हजेरी लावलेली असताना हवामान विभागाकडून पुन्हा एकदा पावसाचा अंदाज वर्तवण्यात आला आहे. मुंबई वेधशाळेने राज्यातील पुढील पाच दिवसांच्या हवामानाचा अंदाज जाहीर केला असून, अनेक जिल्ह्यांना वादळी वाऱ्यासह विजांच्या कडकडाटाचा यलो अलर्ट जारी करण्यात आला आहे. तसंच काही जिल्ह्यांमध्ये मुसळधार पावसाचा अंदाज वर्तवण्यात आला आहे.

हवामान विभागाच्या अलर्टनुसार, २७ जुलै रोजी रायगड, रत्नागिरी , कोल्हापूर जिल्ह्यातील घाट परिसर, सातारा जिल्ह्यातील घाट परिसर आणि पुणे जिल्ह्यातील घाट परिसरात ऑरेंज अलर्ट दिला असून काही ठिकाणी मुसळधार पावसाची शक्यता वर्तवली आहे आहे. तर ठाणे, मुंबई शहर, मुंबई उपनगर, जळगाव, छत्रपती संभाजीनगर, जालना, बुलढाणा, नांदेड, हिंगोली, लातूर, नागपूर, भंडारा, गोंदिया, गडचिरोली आणि सिंधुदुर्ग या जिल्ह्यांमध्ये यलो अलर्ट देण्यात आला असून वादळी वाऱ्यासह विजांच्या कडकडाटाची शक्यता आहे.

२८ जुलै रोजी चंद्रपूर, गडचिरोली, रायगड, जळगाव, पुणे घाट परिसर, रत्नागिरी, सिंधुदुर्ग, कोल्हापूर घाट, छत्रपती संभाजीनगर, जालना, परभणी, हिंगोली, नांदेड, अमरावती, यवतमाळ, वर्धा, नागपूर, भंडारा आणि गोंदिया या जिल्ह्यांसाठी यलो अलर्ट जारी करण्यात आला आहे. २९ जुलै रोजी गोंदिया चंद्रपूर गडचिरोली जिल्ह्यात ऑरेंज अलर्ट दिला आहे. तर नाशिक, नाशिक घाट परिसर, जळगाव, छत्रपती संभाजीनगर, जालना, बुलढाणा, अकोला, वाशिम, अमरावती, यवतमाळ, नागपूर, वर्धा, भंडारा, कोल्हापूर घाट, रत्नागिरी, सातारा घाट, रायगड, पुणे घाट आणि सिंधुदुर्ग या भागात वादळी पावसाची शक्यता वर्तविण्यात आली आहे.

३० जुलै रोजी रायगड, पुणे घाट, सातारा घाट, रत्नागिरी, सिंधुदुर्ग, कोल्हापूर घाट, बुलढाणा, अकोला, वाशिम, अमरावती, यवतमाळ, वर्धा, नागपूर, भंडारा, गोंदिया आणि गडचिरोली या जिल्ह्यांना यलो अलर्ट देण्यात आला आहे.

दरम्यान, विजांच्या कडकडाटाच्या वेळी नागरिकांनी सुरक्षित ठिकाणी राहावे, झाडाखाली उभे राहणे टाळावे तसेच शेतकरी व नागरिकांनी स्थानिक प्रशासनाच्या सूचनांचे पालन करावे, असं आवाहन हवामान विभागानं केलं आहे.

## महाराष्ट्र सायबरची धडक कारवाई! ५०० हून अधिक प्रोफाइल रडारवर

मुंबई : कॉकरोच जनता पार्टीच्या देशभरातील आंदोलनांच्या पार्श्वभूमीवर 'महाराष्ट्र सायबर' या राज्य सरकारच्या नोडल एजन्सीने डिजिटल विश्वात एक अत्यंत मोठी आणि धडक कारवाई केली आहे. सार्वजनिक सुव्यवस्था बिघडवण्यासाठी आणि राष्ट्रीय सुरक्षेला धोका निर्माण करण्यासाठी सीमेपलीकडून चालवल्या जाणाऱ्या ५०० हून अधिक संशयास्पद सोशल मीडिया प्रोफाइलची ओळख पटवण्यात आली आहे. या आंदोलनाचा गैरफायदा घेत सोशल मीडियावर अफवा, चुकीची माहिती आणि एआय-जनरेटेड बनावट मजकूर पसरवण्याचे मोठे आंतरराष्ट्रीय कारस्थान तपासात उघडकीस आले आहे. महाराष्ट्र सायबरने ओपन-सोर्स इंटेलिजन्स, डेटा विश्लेषण, वर्तणूक अभ्यास आणि अत्याधुनिक एआय-फॉरेन्सिक उपकरणांचा वापर करून व्यापक तपास मोहीम राबवली.

## संपादकीय....

### पीडितांना दिलासा

ऑनलाईन शेअर ट्रेडिंग आणि डिजिटल इन्व्हेस्टमेंटच्या नावाखाली देशभरात कोट्यवधी रुपयांची फसवणूक झालेल्या गुंतवणूकदारांना ग्राहक आयोगामार्फत न्याय मिळू शकतो का, या महत्त्वपूर्ण कायदेशीर प्रश्नावर सर्वोच्च न्यायालयाने देशातील प्रमुख बँकांना नोटीस बजावली आहे. या आदेशामुळे ऑनलाईन आर्थिक फसवणुकीच्या हजारो पीडितांना मोठा दिलासा मिळण्याची शक्यता निर्माण झाली आहे. या प्रकरणाची पुढील सुनावणी ३ सप्टेंबर रोजी होणार आहे. हे प्रकरण एका गुंतवणूकदाराशी संबंधित असून, व्हॉट्सप ग्रुप, बनावट ट्रेडिंग प्स आणि अवास्तव नफ्याचे आमिष दाखवून त्यांची तब्बल २ कोटी ८९ लाखांची फसवणूक करण्यात आली. गुंतवणूकदाराचा विश्वास संपादन करण्यासाठी बनावट वेबसाईटवर एनएसईचे कथित रिअल टाईम शेअर बाजार दर दाखवण्यात आले. सुरुवातीला काही प्रमाणात नफा खात्यात जमा करून विश्वास निर्माण करण्यात आला. मात्र, संपूर्ण गुंतवणूक केल्यानंतर पैसे परत मागितल्यावर आणखी रकमेची मागणी करण्यात आली आणि फसवणूक झाल्याचे स्पष्ट झाले. या घटनेनंतर पीडिताने राष्ट्रीय ग्राहक तक्रार निवारण आयोगात धाव घेतली. तक्रारीत बँकांवर गंभीर निष्काळजीपणाचा आरोप करण्यात आला. अल्पावधीत कोट्यवधी रुपयांचे संशयास्पद व्यवहार होत असतानाही रिझर्व्ह बँकेच्या 'केवायसी' आणि मनी लॉन्डरिंग प्रतिबंधक नियमांचे प्रभावी पालन करण्यात बँका अपयशी ठरल्याचा दावा करण्यात आला. मात्र, राष्ट्रीय ग्राहक आयोगाने ही तक्रार फेटाळून लावत शेअर बाजारातील गुंतवणूक ही व्यावसायिक स्वरूपाची असल्याने अशा तक्रारी ग्राहक संरक्षण कायद्यांतर्गत ग्राह्य धरता येणार नाहीत, असे निरीक्षण नोंदवले होते. या निर्णयाला आव्हान देत पीडिताने सर्वोच्च न्यायालयात अपील दाखल केले.

# आठवण... आयुष्यभर जपलेला तो सुवर्णक्षण!

## डॉ. ए. पी. जे. अब्दुल कलाम सरांच्या सहवासातील अविस्मरणीय क्षण

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

खरंच, मी स्वतःला खूप नशिबवान समजतो. कामानिमित्त गेली जवळपास २८ वर्षे पुण्यात वास्तव्यास आहे. वागदरीसारख्या ग्रामीण भागातून शिक्षण पूर्ण करून महाराष्ट्राची सांस्कृतिक राजधानी आणि विद्येचे माहेरघर म्हणून ओळखल्या जाणाऱ्या पुणे शहरात येण्याचा योग आला. या शहराने मला आयुष्यात खूप काही दिले. अनेक आदर्श व्यक्तिमत्त्वांना भेटण्याची, त्यांचे विचार ऐकण्याची आणि त्यांच्याकडून प्रेरणा घेण्याची संधी मिळाली.

परंतु २८ फेब्रुवारी २००५ हा दिवस माझ्या आयुष्यातील सर्वात अविस्मरणीय दिवस ठरला. त्या दिवशी तत्कालीन भारताचे राष्ट्रपती, भारतरत्न, 'मिसाईल मॅन' आणि युवकांचे प्रेरणास्थान डॉ. ए. पी. जे. अब्दुल कलाम यांना प्रत्यक्ष भेटण्याचे भाग्य मला लाभले.



त्या काळात मी पुण्यातील एका अनाथ आश्रमात कार्यरत होतो. त्या आश्रमातील एका कार्यक्रमासाठी राष्ट्रपती म्हणून डॉ. कलाम सर आले होते. त्यावेळी महाराष्ट्राचे तत्कालीन मुख्यमंत्री कै. विलासराव देशमुख हेही उपस्थित होते. त्यांनाही भेटण्याची आणि काही क्षण संवाद साधण्याची संधी मला मिळाली.

त्या दिवशी जवळपास ३० मिनिटे मला डॉ. कलाम सरांच्या सान्निध्यात राहण्याची संधी मिळाली. त्यांना अगदी जवळून पाहिले, त्यांचा मधुर आवाज ऐकला, त्यांचा साधेपणा, नम्र स्वभाव आणि मुलांप्रती असलेले अपार प्रेम अनुभवले. आजही तो प्रत्येक क्षण माझ्या डोळ्यांसमोर जिवंत आहे.

डॉ. कलाम सर अनाथ आश्रमातील लहान मुलांमध्ये इतके रमून गेले होते की, ते त्यांच्यासोबत खेळत होते, गप्पा मारत होते आणि अगदी त्यांच्या वयाचेच झाल्यासारखे त्यांच्यात मिसळले होते. हे सर्व मी अगदी जवळून पाहत होतो. त्या क्षणी माझाच माझ्यावर विश्वास बसत नव्हता. मी त्यांच्याकडे स्वाक्षरी घेण्यासाठी गेलो. त्यांनी अत्यंत प्रेमाने माझ्याशी संवाद साधला आणि त्यांच्या हस्ताक्षरातील अमूल्य सही मला दिली. आजही तो छोटासा कागद मी माझ्या आयुष्यातील सर्वात मौल्यवान ठेवा म्हणून जपून ठेवला आहे.

त्या काळात आजच्यासारखे स्मार्टफोन नव्हते. माझ्याकडे साधा मोबाईल असल्यामुळे त्यांच्यासोबत चांगला फोटो घेता आला नाही. मात्र, एका व्यक्तीने काढलेल्या छायाचित्रात मी त्यांच्या सोबत दिसतो. तो फोटोही माझ्यासाठी अनमोल आठवण आहे.

त्या दिवशी रात्री मला झोपही लागली नव्हती. कारण एकच-मी प्रत्यक्ष डॉ. ए. पी. जे. अब्दुल कलाम सरांना भेटलो होतो! त्या भेटीचा आनंद, अभिमान आणि समाधान शब्दांत व्यक्त करणे आजही कठीण आहे.

आज डॉ. कलाम सर आपल्या सोबत नाहीत. पण त्यांच्यासोबत घालवलेले ते काही क्षण माझ्या आयुष्याची सर्वात मोठी प्रेरणा आणि अमूल्य आठवण म्हणून कायम माझ्या हृदयात जिवंत राहतील.

डॉ. ए. पी. जे. अब्दुल कलाम यांच्या पुण्यतिथीनिमित्त त्यांना विनम्र अभिवादन!

**– धोंडपा नंदे**
**संपादक, साप्ताहिक गावगाथा**

## मोहा येथील जिल्हा परिषद केंद्रीय प्राथमिक शाळेत बालदिंडी सोहळा संपन्न



**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

मोहा प्रतिनिधी/ प्रविण म.कसबे : कळंब तालुक्यातील मोहा येथील जिल्हा परिषद केंद्रीय प्राथमिक शाळा मोहा येथे पवित्र अशा आषाढी वारी निमित्त बालदिंडी सोहळ्याचे आयोजन २४जुलै रोजी करण्यात आले होते.

विद्यार्थ्यांना वारकरी परंपरेची ओळख निर्माण व्हावी तसेच संतांचे विचार आणि भक्तीची प्रेरणा मिळावी या उद्देशाने गावातून मुख्य रस्त्याने विद्यार्थ्यांनी वारकरी ड्रेस परिधान करून टाळ, मृदंग, भगवे झेंडे आणि विठ्ठल रखुमाईच्या प्रतिमासह ज्ञानोबा तुकाराम विठूरायाच्या जयघोषाने अवघी मोहा नगरी दुमदुमली. या बाल वारकरी दिंडी सोहळ्यातून तरुण असणाऱ्या पिढीला समता, एकता, आणि बंधूत्वाचा संदेश देणारी ठरली.

हि वारकरी बाल दिंडी सोहळा यशस्वी करण्यासाठी शाळेच्या मुख्याध्यापिका भिंगारे मॅडम, डिकले सर, पवार सर, बाराते मॅडम अविनाश मडके सर तसेच शाळा व्यवस्थापन समिती अध्यक्ष व सर्व शिक्षिका व शिक्षकवृंद यांनी परिश्रम घेतले. तसेच या कार्यक्रमासाठी विद्यार्थी, पालक, महिला व विठ्ठल भक्तांची मोठी गर्दी होती.

## येरंडी येथील रंगभूमीचा स्वरबहार हविन तागडे हरपला

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**



जवळच्या येरंडी गावचे हौशी ते व्यवसायीक रंगभूमीवर काम करणारे निष्ठावंत कलाकार व गायक हविन तागडे हे होत. त्यांनी एक दशक नाटकांमधून रंगभूमीची अविरत सेवा केली. आणि ते एका अल्पशा आजाराने अनंतात विलीन झाले.

गेल्या अनेक वर्षांपासून नाटकांच्या मैफली सजविणारा आणि 'स्वरबहार' या नावाने प्रसिद्धीच्या झोतात आलेला हविन तागडे आज नाट्यपदांमध्ये गोडी असणाऱ्या रसिकांच्या 'गळ्यातील ताईत' बनला आहे. अर्थशास्त्राचा स्नातक पदवीधर असलेला, एका लहानशा खेड्यात वास्तव्य करून, आपल्या सुप्त कलागुणांना चालना मिळावी, याकरिता रंगमंदिराची पूजा करणारा हा तरुण, झाडीपट्टीतील नाटकांचा 'स्वरबहार' म्हणून नावारूपाला आला.

कुठल्याही संगीत वर्गाला जाऊन त्याने गाण्याचे रीतसर शिक्षण घेतलेले नाही. आवाजाची देण त्याच्या उपजत गुणांचा एक भाग आहे. स्वतः संगीताचे धडे गिरवीत असतानाच हविनने गीतलेखनासाठी प्रयत्न सुरू केले. गाण्यातील पद, धृवपद, ताल, ठेका, लय, उंची या सर्वांचा अचूक मेळ साधत, त्याने आपल्या आवाजाची मधुरता जपली आणि रसिकांना भावविभोर केले. त्याच्या अनेक कार्यक्रमांनी रसिकांना खुर्चीवर खिळवून ठेवले आहे. आपल्या या उपजत कौशल्याबद्दल कौतुक झाले.

त्यामागे जिद्द, चिकाटी निश्चितपणे आहे. संगीतगुरू भास्कर पिंगळे यांनी त्याला नाटकाच्या गीतातील खरी मधुरता शिकविली. 'बाईनं फाग्या दणकावला', 'तेवढंच बोलू नका', 'रक्तात रंगला गाव', 'प्रीतीचा हा वसंत फुलला' आदी नाटके गावाच्या रंगभूमीपासून तर झाडीपट्टी रंगभूमी तागडे यांनी गाजवली होती.

हा कलाकार हाडाचा कलावंत होता. त्यांनी नाटकामधून अनेक भूमिका साकारल्या होत्या आणि पुणे मुंबई सारख्या कलावंतावरोबर काम करायला ही मिळाले होते. त्यांची काही गाणी ध्वणीफितमध्ये संपूर्ण झाडीपट्टी रंगभूमीवर प्रसिद्ध आहे. यातील एक तुझे काजळाचे डोळे ही ध्वणीफित फारच गाजली होती. आणि याचे शिर्षक गित हे हविन तागडे यांचे असल्याचे त्यांनी अनेकदा सांगितले होते.

गावातील रंगभूमीला पन्नास वर्षे उलटुन गेली याची साक्ष हविन तागडे यांनी दिली. जवळपास गावातच त्यांनी विसहून अधिक नाटकात काम केले. म्हणून ही आठवण कायम स्मरणात राहील. याबाबत शंकाच नाही. गाव हळहळतो त्या आठवणीने. .. त्याच्या स्मृतीने.... अखेरचा जयभीम....!

**– मुन्नाभाई नंदागवळी,**
आंबेडकरवादी साहित्याचे अभ्यासक

## गोविंदपूर येथे पालखी सोहळा व बालदिंडी उत्साहात संपन्न




**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

हनुमंत पाटुळे/खामसवाडी (प्रतिनिधी) : कळंब तालुक्यातील गोविंदपूर येथील जि.प. कें.प्राथमिक शाळेत आषाढी एकादशी निमित्त शनिवारी उत्साहपूर्ण वातावरणात पालखी सोहळा आणि बालदिंडीचे आयोजन करण्यात आले.

या भक्तिमय सोहळ्यात शाळा व्यवस्थापन समितीचे सदस्य, ग्रामस्थ, महिला आणि बाल वारकरी मोठ्या संख्येने सहभागी झाले होते. संतांच्या अभंगांचा गजर, टाळ-मृदुंगाचा निनाद आणि फुगड्या व रिंगण खेळांमुळे गाव भक्तिरसात न्हाऊन निघाले.

बाल वारकऱ्यांनी ज्ञानोबा-तुकाराम व रामकृष्ण हरी च्या जयघोषात ग्रामप्रदक्षिणा केली. दिंडी गावातील श्री विठ्ठल-रुख्मिणी मंदिरात पोहोचल्यानंतर महिलांनी पारंपरिक पद्धतीने औक्षण करून त्यांचे स्वागत केले.

यावेळी विद्यार्थ्यांना नानासाहेब मुंडे यांच्या वतीने केळी वाटप करण्यात आली. ग्रामस्थांनी विद्यार्थ्यांच्या उत्स्फूर्त सहभागाचे कौतुक केले. तसेच बालदिंडी हा संस्कारक्षम उपक्रम यशस्वीपणे राबवल्याबद्दल मुख्याध्यापक व शिक्षकवृंदांचे अभिनंदन करण्यात आले.

या प्रसंगी सरपंच आशोक मस्के, उपसरपंच संतोष मुंडे, विश्वास केंगार, नानासाहेब मुंडे, बालाजी सुरवसे यांच्यासह ग्रामस्थ उपस्थित होते.

दिंडी सोहळा यशस्वी करण्यासाठी मुख्याध्यापक कनकवाड हनमंलु, शिक्षक संजय भालेराव, गोविंद गोरे, वसंत इंगळे, गणपती तपिसे, शिक्षिका मनिषा कदम, अनिता आनेराव, मंजुषा घोळवे, वैशाली बांगर, पौर्णिमा मुधोळकर यांनी विशेष परिश्रम घेतले.

## आषाढी एकादशीनिमित्त अण्णाभाऊ साठे नगरात डिजिटल पेमेंट जागृती अभियान; सीएससी व आरबीआयच्या उपक्रमाला नागरिकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद




**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

ठाणे/प्रतिनिधी : भारतीय रिझर्व्ह बँक (ठइख) देशभरात सुरक्षित, विश्वासार्ह आणि व्यापक डिजिटल पेमेंट प्रणालीचा प्रसार करण्यासाठी राबवत असलेल्या विशेष जनजागृती उपक्रमांतर्गत सीएससी ई-गव्हर्नन्स सर्व्हिसेस इंडिया लिमिटेडचे सीएससी व्हीएलई अशोक पाटोळे यांच्या वतीने आषाढी एकादशीच्या निमित्ताने संघमित्रा अंगणवाडी, अण्णाभाऊ साठे नगर, नारपोली (भिवंडी) येथे डिजिटल पेमेंट जागृती कार्यक्रम उत्साहात पार पडला.

या कार्यक्रमात अण्णाभाऊ साठे नगर परिसरातील बहुसंख्य महिला व नागरिकांना एकत्रित करून डिजिटल व्यवहारांचे महत्त्व, सुरक्षित ऑनलाइन व्यवहाराची पद्धत, यूपीआय (णझख) प्रणालीचा वापर तसेच डिजिटल पेमेंट करताना घ्यावयाची काळजी याबाबत सविस्तर मार्गदर्शन करण्यात आले.

कार्यक्रमास सीएससीचे केंद्रीय समन्वयक बी. के. सिंग, प्रज्ञेश त्रिपाठी, महाराष्ट्र राज्य समन्वयक निलेश धांडे तसेच ठाणे जिल्हा व्यवस्थापक श्याम वाघ यांची प्रमुख उपस्थिती लाभली. उपस्थित मान्यवरांनी डिजिटल व्यवहारामुळे नागरिकांचा वेळ, पैसा आणि श्रम यांची बचत होत असून पारदर्शक आर्थिक व्यवहारांना चालना मिळत असल्याचे सांगितले.

कार्यक्रमाची माहिती व प्रात्यक्षिक सादरीकरण सीएससी व्हीएलई शुभांगी ठोसर यांनी केले. त्यांनी उपस्थित महिला व पुरुषांना यूपीआयद्वारे पैसे पाठविणे, प्राप्त करणे, क्यूआर कोडद्वारे पेमेंट करणे, फसवणुकीपासून बचावासाठी घ्यावयाची खबरदारी आणि डिजिटल व्यवहार करताना सुरक्षिततेचे नियम याबाबत सोप्या भाषेत मार्गदर्शन केले. कार्यक्रमाच्या समारोपावेळी सीएससीचे केंद्रीय समन्वयक बी. के. सिंग यांनी भारतीय रिझर्व्ह बँकेच्या डिजिटल पेमेंट साक्षरता अभियानाची उद्दिष्टे स्पष्ट करताना प्रत्येक नागरिकाने सुरक्षित आणि जबाबदारीने डिजिटल व्यवहार स्वीकारणे ही काळाची गरज असल्याचे सांगितले. ग्रामीण व शहरी भागातील प्रत्येक नागरिक डिजिटल अर्थव्यवस्थेशी जोडला जावा, हा या अभियानामागील मुख्य हेतू असल्याचे त्यांनी नमूद केले.

शेवटी ठाणे जिल्हा व्यवस्थापक श्याम वाघ यांनी उपस्थित मान्यवर, महिला व नागरिकांचे आभार मानले. कार्यक्रमाला परिसरातील महिलांचा उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला असून डिजिटल व्यवहारांविषयी जनजागृती निर्माण करण्याच्या दृष्टीने हा उपक्रम अत्यंत उपयुक्त ठरल्याची भावना उपस्थितांनी व्यक्त केली.

## प्रधान सचिव डॉ. हर्षदीप कांबळे विद्यार्थ्यांमध्ये रमले; मुलांशी साधला आत्मिक संवाद

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पुणे : प्रशासकीय जबाबदाऱ्यांच्या धावपळीतून क्षणभर वेळ काढून जेव्हा एखादा वरिष्ठ अधिकारी विद्यार्थ्यांच्या सहवासात रमतो, त्यांच्या डोळ्यांतील स्वप्नांना जवळून पाहतो आणि त्यांच्या भवितव्याची काळजी आपल्या शब्दांतून व्यक्त करतो, तेव्हा तो क्षण केवळ औपचारिक भेटीचा राहत नाही, तर संवेदनशील प्रशासनाचा प्रेरणादायी संदेश ठरतो. अशीच एक हृदयस्पर्शी भेट आज राज्याच्या सामाजिक न्याय विभागाचे प्रधान सचिव डॉ. हर्षदीप कांबळे यांनी येरवडा येथील बार्टीच्या परिसरातील सफाई कामगारांच्या मुला-मुलींच्या शाळा व वस्तीगृहाला दिली व तेथील मुलांशी आत्मिक संवाद साधला.



समाजकल्याण विभागाच्या अधिकाऱ्यांची बैठक डॉ. बाबासाहेब आंबेडकर संशोधन व प्रशिक्षण संस्था बार्टीच्या येरवडा कॅम्प परिसरात आयोजित करण्यात आली होती.ही बैठक संपल्यानंतर डॉ. कांबळे यांनी आवर्जून विद्यार्थ्यांची भेट घेतली. शाळेतील वर्गात प्रवेश करताच त्यांनी डिजिटल शिक्षण पद्धतीची सविस्तर माहिती जाणून घेतली. वर्गात बसून शिक्षक व मुख्याध्यापकांशी संवाद साधत शिक्षणाच्या गुणवत्तेचा आढावा घेतला.

यानंतर त्यांनी जवळच असलेल्या वस्तीगृहात जाऊन विद्यार्थ्यांशी मनमोकळ्या गप्पा मारल्या. त्यांच्या जेवणाची व्यवस्था, अभ्यासाची दिनचर्या, गाव, कुटुंब आणि भविष्यातील स्वप्ने याविषयी त्यांनी आस्थेने विचारपूस केली. इयत्ता पहिलीतील विद्यार्थ्यांकडून इंग्रजी वर्णमाला म्हणवून घेत त्यांच्या आत्मविश्वासाचे मनापासून कौतुक केले. चिमुकल्यांच्या निरागस हसण्यात आणि उत्स्फूर्त संवादात डॉ. कांबळे इतके रमले की, काही काळासाठी प्रशासकीय पदाची औपचारिकता बाजूला पडून ते विद्यार्थ्यांचे प्रेमळ मार्गदर्शक बनले.

विद्यार्थ्यांशी साधलेल्या या आत्मीय संवादातून त्यांचे स्वतःचे विद्यार्थी जीवनही त्यांच्या स्मरणात दाटून आले. विद्यार्थ्यांमधील जिज्ञासा, शिस्त, आत्मविश्वास आणि प्रगती पाहून त्यांनी समाधान व्यक्त केले. ही शाळा केवळ शिक्षण देणारी संस्था न राहता राज्यासाठी प्रेरणादायी 'मॉडेल शाळा' म्हणून विकसित व्हावी, असा संकल्प त्यांनी यावेळी व्यक्त केला.

या प्रसंगी समाजकल्याण आयुक्त दीपा मुधोळ-मुंढे, उपायुक्त प्रशांत चव्हाण, बार्टीच्या निबंधक डॉ. सुचित्रा शिंदे, विभाग प्रमुख शुभांगी पाटील विभाग प्रमुख डॉ. बबन जोगदंड मुख्याध्यापक जयश्री चंडके तसेच समाजकल्याण विभागाचे अन्य वरिष्ठ अधिकारी उपस्थित होते.

विद्यार्थ्यांच्या चेहऱ्यावरील आनंद, प्रधान सचिवांचा जिव्हाळ्याचा संवाद आणि शिक्षणाबाबत व्यक्त झालेला दूरदृष्टीचा संकल्प यामुळे ही भेट वेगळी ठरली.

हे वृत्तपत्र मालक, सिद्धार्थ सोशल फौंडेशन यांनी मुद्रक, प्रकाशक, संपादक कमलाकर ज्ञानदेव सोनकांबळे यांच्या सम्यक पब्लिकेशन अँड प्रिंटर्स २४७, बुद्ध विहार, रमाबाई आंबेडकर नगर, बुधवार पेठ, सोलापूर ४१३००२ महाराष्ट्र येथे छापून मु. पो. गोगांव ता. अक्कलकोट जि. सोलापूर ४१३२१८ महाराष्ट्र येथे प्रकाशित केले. **संपादक : कमलाकर ज्ञानदेव सोनकांबळे** ई-मेल - yashsiddhinews@gmail.com www.yashsiddhinews.com Mo. 9921988358

This Newspaper is printed by the Owner Shidharth Social Foundation, Printer, Publisher, Editor Kamalakar Dayndev Sonakamble at Samyak Publications and Printers 247, Budha Vihar, Ramabai Ambedkar Nagar, Budhwar Peth Solapur-413002 (Maharashtra), Published, at Gogaon Tal Akkalkot Dist Solapur 413218 (Maharashtra). Editor : Kamalakar Dayndev Sonakamble

■ **प्रशासकीय कार्यालय** : सम्यक उद्योग समूह, पृथ्वी एंटरप्राइजेस, सर्वे नं. ६५९/८, शॉप नं. ४, राजीव गांधी नगर, न्यू अप्पर बस स्टॉप, बिबवेवाडी पुणे-३७ ■ **विभागीय कार्यालय** : प्रबुद्ध इंटरप्राइजेस, दुकान नं. २ अमरधान चौक, खेमानी उल्हासनगर ४२१००२

# अवलोकन रानमेवा रानभाजीचे....

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

अर्जुनी मोरगाव तालुका नियोजित दौऱ्यावर असताना आमदार राजकुमार बडोले यांनी आठवडी बाजाराला भेट दिली असता, पावसाळ्यात उगवणारीरी पारंपरिक रानभाजी 'लेंगडा भाजी' बाजारात दिसली. त्या रानभाजीचे अवलोकन करून मोठे कौतुक आमदार राजकुमार बडोले यांनी केले. गोंदिया जिल्ह्यात विपुल जंगलसंपदा असल्यामुळे विविध प्रकारच्या रानभाज्या आणि रानमेवा मोठ्या प्रमाणात आढळून येतात. या नैसर्गिक संपदेचा स्थानिकांच्या आहारात आणि जीवनशैलीत महत्त्वाचा वाटा असून, अशा पारंपरिक खाद्यसंस्कृतीचे जतन आणि संवर्धन करणेही तितकेच आवश्यक आहे.



# गेले पाच दिवसापासून पुणे जिल्ह्यात दमदार पाऊस पडल्याने उजनीची वाटचाल शंभरीकडे

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पंढरपूर : गेल्या पाच दिवसापासून पुणे जिल्ह्यामध्ये दमदार पाऊस पडत आहे, त्यामुळे दौंड इथून उजनी दातांमध्ये ६० हजार क्युसेक्स पाण्याची आवक होत आहे. उजनी धरण ९५ टक्के भरले असून आता उजनीची वाटचाल १००% कडे सुरू आहे. उजनी धरणातून सुमारे ६६०० व क्यू सेक्स पाण्याचा विसर्ग भीमा नदी पात्रात सोडण्यात आला आहे त्यामुळे शेतकऱ्यांमध्ये समाधान व्यक्त होत आहे.

**उजनी धरणे सोलापूर जिल्ह्यासाठी वरदायेणी**

आणि ठरले आहे. उजनी धरण १००% भरल्यानंतर सोलापूर जिल्ह्यात शेतीसाठी व पिण्यासाठी पाणी सोन्या दीदी त्यामुळे शेतकऱ्याची डोळे उजनी धरणाकडे लागलेली दिसून येतात. गेल्या वर्षी मे महिन्यामध्ये पावसाला सुरुवात झाली होती. मात्र यंदाच्या वर्षी जून महिना संपला तरी पाऊस म्हणावा तसा होत नव्हता. त्यामुळे उजनी धरणातील पाण्याची पातळी वजा २८% पोहोचली होती . त्यामुळे शासनाने धरणातील पाणी पिण्यासाठी राखीव ठेवली होते. व पाऊस पडत नसल्यामुळे शेतकरी ही चिंताग्रस्त होता.

मात्र जुलै महिन्यामध्ये चांगला पाऊस पडल्यामुळे उजनी धरणात दौंड येथून पाण्याची आवक सुरू झाली आहे. त्यामुळे धरण वजा २८% वरून ५०% कडे पोचले होते. त्यानंतर मात्र पावसाने विश्रांती घेतली होती. गेल्या पाच दिवस-।पासून पुणे जिल्ह्यामध्ये दमदार पाऊस पडू लागला आहे त्यामुळे दौंड येथून उजनी धरणा मध्ये ६०००० टू सेक्स पाण्याचा विसर्ग होत आहे त्यामुळे उजनी धरण ९५



टक्के भरले आहे. आता उजनीचे वाटचाल शंभर टक्के सुरू आहे.

धरणात मोठ्या प्रमाणात पाणी येत असल्यामुळे उजनीतून सीना माढा व दहिगाव सिंचनासाठी शेतीला पाणी सोडण्यात येत आहे. तसेच भीमा नदी पात्रात ६,६०० क्युसेक्स पाण्याचा विसर्ग सोडण्यात आला असल्यामुळे नदीकाठच्या गावांना सतर्कतेचा इशारा देण्यात आला आहे.

# सुपतगाव जि. प. शाळेत आषाढी एकादशीनिमित्त दिंडी सोहळा थाटात संपन्न; 'ज्ञानोबा-तुकाराम'च्या जयघोषाने गाव दुमदुमले



**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

उमरगा/प्रतिनिधी : आषाढी एकादशीचे औचित्य साधून सुप-तगाव येथील जिल्हा परिषद प्राथमिक शाळेच्या वतीने संत ज्ञानेश्वर महाराज पालखी व भव्य दिंडी सोहळ्याचे अतिशय उत्स-ाहात आणि भक्तिमय वातावरणात आयोजन करण्यात आले होते.

विठ्ठल-रुक्मिणीच्या विलोभनीय रुपात सज-लेले बालवारकरी, डोक्यावर तुळशीवृंदावन घेतलेल्या विद्यार्थिनी आणि टाळ-मृदुंगाचा गजर करत निघालेल्या वारकऱ्यांम-ुळे संपूर्ण सुपतगाव भक्तिरसात न्हाऊन निघाले.

भजन, फुगडी आणि फुलीचा ठेका!

शाळेच्या प्रांगणातून सुरु झालेली ही दिंडी संपूर्ण गावातून थाटामाटात काढण्यात आली. यावेळी 'हनुमान भजनी मंडळा'चे वारकरी, शालेय विद्यार्थी आणि शिक्षकांनी अभंगांच्या तालावर ठेका धरला.

बालवारकऱ्यांचा उत्साह: दिंडीमध्ये विद्यार्थ्यांनी मारलेली पाऊले, घातलेली फुगडी आणि टाळांचा गजर यामुळे वातावरण भारावून गेले होते.

ज्ञानोबा-तुकारामांचा जयघोष: ज्ञानेश्वर माऊली-तुकाराम आणि विठ्ठल रुक्मिणी च्या जयघोषाने संपूर्ण सुपतगाव परिसर दुमदुमून गेला.

**गावकऱ्यांचा उत्स्फूर्त प्रतिसाद**

दिंडीचे गावात ठिकठिकाणी ग्रामस्थ व भाविक भक्तांकडून जंगी स्वागत करण्यात आले. अनेक ठिकाणी पालखीचे पूजन करून बालवारकऱ्यांना अल्प-ोपहार व फळांचे वाटप करण्यात आले. या सोहळ्यासाठी गाव-ातील महिला व भाविक भक्त मोठ्या संख्येने उपस्थित होते.

शालेय वयातच विद्यार्थ्यांना आपल्या संस्कृतीची व वारकरी संप्रदायाची ओळख व्हावी, तसेच त्यांच्यावर उत्तम संस्कार व्हावेत या उद्देशाने या दिंडी सोहळ्याचे आयोजन करण्यात आले होते.

या उपक्रमाच्या यशस्वीतेसाठी शाळेचे मुख्याध्यापक श्री. व्यंकट क्षीरसागर, शिक्षक श्री. राजेश सूर्यवंशी व श्री. चिदानंद स्वामी तसेच हनुमान भजनी मंडळाच्या सदस्यांनी विशेष परिश्रम घेतले. उपक्रमाबद्दल सर्व स्तरातून शाळा व्यवस्थापन व शिक्षकांचे कौतुक होत आहे.

# पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर कर्जमुक्ती योजनेत चांदोरी येथे शेतकरी यादी प्रकाशित

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

निफाड/प्रतिनिधी : पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर शेतकरी कर्जमुक्ती योजना २०२६ अंतर्गत पात्र ठरलेल्या शेतकऱ्यांच्या यादीचे आज चांदोरी ता. निफाड येथे जिल्हाधिकारी आयुष प्रसाद यांच्या उपस्थितीत प्रकाशन करण्यात आले.

चांदोरी येथील गोदा-वरी विविध कार्यकारी सहकारी संस्थेच्या आवारात हा कार्यक्रम झाला.

यावेळी खासदार भास्कर भगरे, उपविभागीय अधिकारी डॉ शशिकांत मंगरूळे, तहसीलद-ार विशाल नाईकवाडे, संस्थेचे



चेअरमन संजय गायके, सरपंच विनायक खरात, बँक अधिकारी श्री. कोरडे, श्री. पेखळे, सचिव श्री. डावकर यांच्यासह संस्थेचे पदाधिकारी, सहकार विभागाचे अधिकारी उपस्थित होते.

जिल्हाधिकारी श्री. प्रसाद यांनी सांगितले की, राज्य पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर शेतकरी कर्जमुक्ती योजना २०२६ जाहीर केली आहे. ही योजना अत्यंत महत्त्वाची आहे. कर्जमाफी योजनेच्या जाहीर केलेल्या याद्या बँका व पतसंस्थांना देण्यात आल्या आहेत. त्या संबंधितांनी तपासून अहवाल सादर करावा, असेही सांगितले.

# पडघ्यात टी.ए. पाटील इंग्रजी शाळेच्या रस्त्यावर झाड कोसळले; मोठी दुर्घटना टळली

**या आठवड्यातील जीर्ण झाड कोसळण्याची पडघ्यातील दुसरी घटना; पालकांमध्ये चिंता**

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

ठाणे प्रतिनिधी/मिलिंद जाधव : सतत सुरू असलेल्या मुसळधार पावसामुळे भिवंडी तालुक्यातील पडघा येथील टी.ए. पाटील इंग्रजी शाळेजवळ काल दुपारी सुमारे १२.३० वाजण्याच्या दरम्यान भलेमोठे जीर्ण झाड कोसळले. सुदैवाने या घटनेत कोणतीही जीवितहानी झाली नाही. मात्र, या आठवड्यात पडघ्यात झाड कोसळण्याची ही दुसरी घटना असल्याने पालकांमध्ये चिंतेचे वातावरण निर्माण झाले आहे. मिळालेल्या माहितीनुसार, जोरदार वाऱ्यासह सुरू असलेल्या पावसामुळे टी.ए.



पाटील इंग्रजी शाळेकडे जाणाऱ्या रस्त्यालगतचे एक जीर्ण झाड अचानक कोसळले. त्यावेळी सकाळच्या सत्रातील शाळा नुकतीच सुटली होती, तर दुपारच्या सत्रातील विद्यार्थी शाळेत येत होते. विद्यार्थी आणि पालक यांची या रस्त्यावर मोठी वर्दळ असतानाच ही घटना घडली. विद्यार्थ्यांना शाळेत आणण्यासाठी आलेल्या काही शालेय व्हॅनही काही काळ अडकून पडल्या. मात्र, सुदैवाने कोणतीही जीवितहानी किंवा मोठी दुर्घटना घडली नाही. घटनेची माहिती मिळताच पडघा ग्रामपंचायतीच्या कर्मचाऱ्यांनी तात्काळ घटनास्थळी धाव घेतली. तसेच संबंधित प्रशास-नालाही याची माहिती देण्यात आली असून, झाड हटविण्याची कार्यवाही हाती घेण्यात येणार आहे.

दरम्यान, परिसरातील जीर्ण व धोकादायक झाडांचे तातडीने सर्वेक्षण करून त्यांची छाटणी अथवा आवश्यकतेनुसार हटविण्याची कार्यवाही करण्यात यावी, अशी मागणी नागरिकांनी पुन्हा एकदा केली आहे. ही बातमी आणखी वृत्तपत्रीय शैलीत किंवा अधिक प्रभावी शीर्षकासहही तयार करून देऊ शकतो.

# मूकबधिर मुला-मुलींनी बनवलेल्या दिनदर्शिकाचे प्रकाशन सोहळा

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पंढरपूर : श्री गणेश संचालित मित्र मंडळ मूकबधिर निवासी मूकबधिर विद्यालय पंढरपूर मूकबधिर मुला-मुलींनी बनवलेल्या दिनदर्शिकाची प्रकाशन महाराष्ट्र राज्याचे मुख्यमंत्री श्री देवेंद्र फडणवीस यांच्या शुभहस्ते, कृषी उत्पन्न बाजार समिती येथे कृषी प्रदर्शनाच्या कार्यक्रमात या दिनदर्शिकाचे प्रकाशन सोहळा संपन्न झाला.

शुक्रवार दिनांक २४ जुलै २०२६ रोजी आषाढी यात्रेचे औचित्य साधून पंढरपूर मधील श्री गणेश रुग्णसेवा मित्र मंडळ संचालित निवासी मूकबधिर



विद्यालय पंढरपूर मधील मुला म-ुलींनी बनवलेल्या दिनदर्शिकाचे प्रकाशन सोहळा महाराष्ट्र राज्याचे मुख्यमंत्री मा देवेंद्र फडणवीस यांच्या शुभहस्ते संपन्न झाला.

**मा. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या शुभहस्ते संपन्न**

या कार्यक्रमाप्रसंगी यांनी दिव्यांगाचे अभिनंदन केले.

सदर कार्यक्रमाप्रसंगी सोलापूर जिल्ह्याचे पालकमंत्री जयकुमार गोरे , संस्थेचे अध्यक्ष मा. प्रशांत परिचारक, आमदार गोपीचंद पडळकर, आमदार समाधान आवताडे, आमदार राजाभाऊ राऊत, आमदार अभिजीत पाटील, संस्थेचे चेअरमन रा.पा. तसेच जिल्ह्यातील आमदार व जिल्हा परिषद अध्यक्ष कृषी उत्पन्न बाजार समितीचे सभापती हरीश गायकवाड, उपस्थित होते. सर्वांनी दिव्यांग विद्यार्थ्यांना अभिनंदन करून पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या.

दिनदर्शिका बनवण्यासाठी संस्थेचे अध्यक्ष मा. श्री प्रशांत परिचारक, व संस्थेचे चेअरमन श्री रा .पा. कटेकर, व मूकबधिर विद्यालयाच्या मुख्याध्यापिका , शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचारी यांचे बहुमोल सहकार्य लाभले.

**भारतीय बौद्ध महासभेसह हजारोंचा मोर्चा; उपविभागीय अधिकारी संजय खडसे यांना निवेदन, निर्णय मागे घेण्याची जोरदार मागणी**

# आरक्षण उपवर्गीकरणाविरोधात सिंदखेडराजात बौद्ध समाजाचा विराट एल्गार

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

राहुल साबळे / बुलढाणा जिल्हा प्रतिनिधी : सिंद-खेड राजा : आरक्षणाच्या उपवर्गीकरणाच्या विरोधात सिंदखेड राजा येथे भारतीय बौद्ध महासभा आणि समस्त बौद्ध समाजाच्या वतीने विराट म-ोर्चाचे आयोजन करण्यात आले. अनुसूचित जातींच्या घटनात्मक अधिकारांवर कुठलाही आघात सहन केला जाणार नाही, असा ठाम इशारा आंदोलनकर्त्यांनी शासनाला दिला. या मोर्चात महिला, युवक, ज्येष्ठ नागरिक, सामाजिक कार्यकर्ते आणि विविध संघटनांचे प्रतिनिधी मोठ्या संख्येने सहभागी झाले होते.

मोर्चाची सुरुवात गेस्ट हाऊस येथून शिस्तबद्ध पद्धतीने करण्यात आली. आंदोलनकर्त्यांनी हातात निळे झेंडे, भारतीय संविधानाच्या प्रती आणि विविध मागण्यांचे फलक घेऊन शहरातील प्रमुख म-ार्गावरून तहसील कार्यालयाकडे




कूच केले. संविधान वाचवा - आरक्षण वाचवा, आरक्षण उपवर्गीकरण रद्द करा,

डॉ. बाबासाहेब आंबेडकर अमर राहो आणि जय भीम अशा घोषणांनी संपूर्ण परिसर दुमदुमून गेला.

मोर्चादरम्यान भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर आणि महात्मा जोतिराव फुले यांच्या पुतळ्यांना पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले.

यावेळी सामाजिक न्याय, समता आणि बंधुतेची मूल्ये जपण्याची शपथ उपस्थितांनी घेतली. संविधानाने दिलेल्या आरक्षणाच्या अधिकाराला धक्का पोहोचविण्याचा कोणताही प्रयत्न यशस्वी होऊ दिला जाणार नाही, अशी भावना आंदोलनकर्त्यांनी व्यक्त केली.

यानंतर मोर्चा उपविभागीय अधिकारी कार्यालयात पोहा-ेचला. भाई बबनरावजी म्हस्के, पंडितराव खंदारे, बालू म्हस्के, ब्रम्हा पाडमुख, भाई दिलीप खरात, योगेश म्हस्के, सिद्धार्थ जाधव, प्रकाश गाडेकर, संजय डोंगरे, गजानन निकाळजे, कैलास झिने तसेच भारतीय बौद्ध महासभेचे पदाधिकारी, समस्त बौद्ध बांधव आणि विविध सामाजिक संघटनांच्या प्रतिनिधींच्या उपस्थितीत उपविभागीय अधिकारी संजय खडसे यांना शासनाच्या नावे निवेदन सादर करण्यात आले.

निवेदनात आरक्षणाचे उपवर्गीकरण तातडीने रद्द करावे, अनुसूचित जातींच्या घटनात्मक अधिकारांचे संरक्षण करावे आणि सामाजिक न्यायाच्या तत्त्वांशी कोणतीही तडजोड करू नये, अशा प्रमुख मागण्या करण्यात आल्या.

यावेळी वक्त्यांनी आपल्या भाषणातून आरक्षण हा कोणत्याही समाजावर केलेला उपकार नसून संविधानाने दिलेला घटनात्मक अधिकार असल्याचे स्पष्ट केले. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी दिलेल्या संविधानामुळे वंचित, शोषित आणि दुर्बल घटकांना न्याय मिळाला असून त्या अधिकारांवर गदा आणण्याचा कोणताही प्रयत्न बौद्ध समाज सहन करणार नाही, असे मत त्यांनी व्यक्त केले.

भारतीय बौद्ध महासभेच्या पदाधिकाऱ्यांसह विविध बौद्ध व सामाजिक संघटनांचे प्रतिनिधी, महिला, युवक आणि समस्त बौद्ध बांधव मोठ्या संख्येने या आंदोलनात सहभागी झाले होते. संपूर्ण मोर्चा शांततापूर्ण, शिस्तबद्ध आणि उत्स्फूर्त वाता-वरणात पार पडला.

शेवटी, शासनाने आर-क्षण उपवर्गीकरणाचा निर्णय त्वरित मागे घ्यावा, अन्यथा राज्यभर तीव्र लोकआंदोलन उभारण्यात येईल, असा इशारा आंदोलनकर्त्यांनी दिला

# निफाड साईट लिस्टच्या वतीने कारगिल विजय दिनानिमित्त सायकल राईड




**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**


निफाड/प्रतिनिधी : निफाड सायकलिस्ट निफाड वती-ने कारगिल विजय दिनानिमि-त्त आणि राष्ट्रीय अंमली पदार्थ विरोधी दिन निमित्त सायकल राईड चे आयोजन करण्यात आले होते.

निफाड पंचायत समिती कार्यालयातील हुतात्मा स्मारक येथे अभिवादन करून राईड ला सुरूवात करण्यात आली. त्यानंतर कुंदेवाडी, दावचवाडी, लोणवाडी, पिंपळगाव येथे अंम-ली पदार्थ विरोधी जनजागृती करण्यात आली. जीवनात अमली पदार्थ सेवनाने होणारे दुष्परिणाम याबाबत जनजागृती करण्यात आली. राईड मध्ये निफाड सायकलिस्ट उपाध्यक्ष संदीप गवळी, संचालक राजु गवळे सदस्य किरण पोरजे, प्रविण तनपुरे यांनी सहभाग नोंदवला.

# एआय तंत्रज्ञानाचा वापर करून पंढरपूर आषाढी वारीत ३२ लाख भाविकांची अचूक मोजणी

## सोलापूर ग्रामीण पोलिसांचा ऐतिहासिक उपक्रम



**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पंढरपूर : श्रीक्षेत्र पंढरपूर येथील आषाढी वारी २०२६ मध्ये सोलापूर ग्रामीण पोलीस दलाने सुरक्षेसोबतच गर्दी व्यवस्थापनात एक ऐतिहासिक आणि अत्याधुनिक टप्पा गाठला आहे. सोलापूर ग्रामीणचे पोलीस अधीक्षक अतुल कुलकर्णी यांच्या संकल्पनेतून आणि मार्गदर्शनाखाली यंदाच्या वारीत सेंटियंट लॉजिक्स या तंत्रज्ञान संस्थेच्या मदतीने अत्याधुनिक 'कॉग्निटिव्ह व्हिज्युअल ह्युमन न्यूरल एआय' तंत्रज्ञानाचा यशस्वी वापर करण्यात आला. या तंत्रज्ञानाच्या साहाय्याने २४ ते २६ जुलै दरम्यान पंढरपुरात दाखल झालेल्या ३१९८१२९ (सुमारे ३२ लाख) भाविकांची अचूक नोंद करण्यात आली आहे.

**तीन दिवसांतील वारकरी आगमनाची अचूक आकडेवारी**

एआय प्रणालीने केलेल्या अचूक मोजणीनुसार तीन दिवसांत पंढरपुरात आलेले भाविक:

२४ जुलै २०२६ रोजी ६,७५,२७४ वारकरी

२५ जुलै २०२६ (आषाढी एकादशी) रोजी १८,९६,५७३ वारकरी

२६ जुलै २०२६ रोजी ६,२६,२८२ वारकरी

असे एकूण: ३१, ९८,१२९ वारकरी भाविकांची नोंद करण्यात आली

आषाढी एकादशीच्या दिवशी म्हणजेच दि. २५ जुलै रोजी सर्वाधिक सुमारे १९ लाख वारकऱ्यांनी पंढरपुरात प्रवेश केल्याचे या नोंदीवरून स्पष्ट झाले आहे.

दुबार मोजणी टाळणारे आधुनिक एआय तंत्रज्ञान

पारंपरिक कॅमेरा पद्धतीमध्ये एकच व्यक्ती विविध कॅमेऱ्यांसमोर आल्यास आकडेवारी फुगण्याची शक्यता असते. मात्र, सोलापूर ग्रामीण पोलिसांनी वापरलेल्या एआय प्रणालीने ही दुबार नोंद पूर्णपणे टाळली.

मुख्य प्रवेशद्वारांवर एआय आयडेंटिटी: सरगम चौक ते इंदिरा गांधी चौक, तीन रस्ता ते दगडी पूल, गोपाळपूर पूल, सावरकर चौक व मिलिटरी हॉस्टेल आणि सांगोला चौक एन्ट्री चा पाचवा मुख्य मार्गांवर खास एआय कॅमेरे बसवण्यात आले होते. व्यक्तीचा चेहरा, कपड्यांचा रंग आणि टोप्यांचा ताळमेळ लावून प्रत्येक वारकऱ्याची एक 'युनिक एआय ओळख' तयार केली जात होती.

क्रॉस-कॅमेरा ट्रॅकिंग व पुनर्प्रवेश पडताळणी: वारकरी शहरात फिरताना इतर सीसीटीव्ही कॅमेऱ्यांनी त्यांना न मोजता एकाच ओळखीने ट्रॅक केले. तसेच शहराबाहेर जाऊन पुन्हा प्रवेश करणाऱ्या भाविकांची जुन्या नोंदीशी पडताळणी करून दुबार मोजणी रोखण्यात आली.

**नागरिकांच्या गोपनीयतेचे तंतोतंत पालन**

या मोजणीदरम्यान भाविकांच्या गोपनीयतेची पूर्ण दक्षता घेण्यात आली. भारताचा *'डिजिटल पर्सनल डेटा प्रोटेक्शन ॲक्ट' (डीपीडीपी) आणि जीडीपीआर नियमावलीचे तंतोतंत पालन करण्यात आले असून, कोणत्याही व्यक्तीचा फोटो किंवा वैयक्तिक माहिती सर्व्हरवर सेव्ह करण्यात आलेली नाही.

पंढरपूर आषाढी वारी हा जगातील सर्वात मोठ्या धार्मिक सोहळ्यांपैकी एक आहे. लाखो वारकऱ्यांच्या सुरक्षिततेसाठी आणि योग्य नियोजनासाठी गर्दीचा अचूक अंदाज असणे अत्यंत आवश्यक असते. पारंपरिक पद्धतींमधील त्रुटी दूर करून यंदा सोलापूर ग्रामीण पोलीस दलाने एआय तंत्रज्ञानाचा वापर करून सुमारे ३२ लाख युनिक भाविकांची अचूक नोंद केली आहे. या अत्याधुनिक तंत्रज्ञानाचा फायदा भविष्यातील गर्दी व्यवस्थापन, आपत्ती व्यवस्थापन आणि कायदा व सुव्यवस्था राखण्यासाठी मोठ्या प्रमाणावर होईल. असे जिल्हा पोलीस अधीक्षक अतुल कुलकर्णी यांनी सांगितले.

---

## ॲड. प्रा. सदाशिव माळगे यांना 'डॉ. कलाम राष्ट्र उभारणी प्रेरणा पुरस्कार-२०२६' प्रदान




**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पुणे : भारताचे माजी राष्ट्रपती, भारतरत्न डॉ. ए. पी. जे. अब्दुल कलाम यांच्या पुण्यतिथीनिमित्त आयोजित राज्यस्तरीय सोहळ्यात अक्कलकोट तालुक्यातील आळगे गावचे सुपुत्र ॲड. प्रा. सदाशिव माळगे यांना 'डॉ. कलाम राष्ट्र उभारणी प्रेरणा पुरस्कार-२०२६' प्रदान करून गौरविण्यात आले.

ड्रीम फाऊंडेशन, डॉ. कलाम कौशल्य विकास केंद्र, पुणे, चाणक्य गुरुकुल अकॅडमी आणि बसव संगम शेतकरी गट यांच्या संयुक्त विद्यमाने पुण्यातील मराठा चेंबर्स ऑफ कॉमर्स, हडपसर पुणे येथे हा भव्य पुरस्कार सोहळा संपन्न झाला.

या कार्यक्रमाचे उद्घाटन माजी डीआरडीओ वरिष्ठ वैज्ञानिक डॉ. अशोक जी. नगरकर यांच्या हस्ते झाले. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी डॉ. सुजित धर्माधिकारी (संचालक, एमआयटी पुणे) होते. विविध क्षेत्रातील मान्यवर, उद्योजक, शिक्षणतज्ज्ञ, सामाजिक कार्यकर्ते आणि पुरस्कार विजेते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

ॲड. प्रा.सदाशिव माळगे यांनी शिक्षण, पत्रकारिता, समाजसेवा आणि युवकांमध्ये सामाजिक जाणीव निर्माण करण्यासाठी सातत्याने केलेल्या उल्लेखनीय कार्याची दखल घेत हा प्रतिष्ठेचा पुरस्कार प्रदान करण्यात आला. ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांना मार्गदर्शन, सामाजिक प्रबोधन आणि विविध शैक्षणिक उपक्रमांमधील त्यांचे योगदान विशेष उल्लेखनीय मानले जाते.

पुरस्कार स्वीकारल्यानंतर ॲड. प्रा. माळगे यांनी हा सन्मान आपल्या कुटुंबीय, गुरुजन, सहकारी आणि समाजातील सर्व हितचिंतकांना समर्पित करत, भविष्यातही समाजहिताची कार्ये अधिक जोमाने सुरू ठेवण्याचा संकल्प व्यक्त केला.

या गौरवाबद्दल अक्कलकोट तालुक्यासह आळगे गावातील ग्रामस्थ, विविध सामाजिक, शैक्षणिक, पत्रकार आणि राजकीय क्षेत्रातील मान्यवरांकडून ॲड. प्रा. सदाशिव माळगे यांच्यावर अभिनंदनाचा वर्षाव होत आहे.

## फॅमिली प्लॅनिंग सोलापूर शाखेच्या अध्यक्षपदी डॉ. गौरी कहाते यांची निवड




**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

सोलापूर : येथील फॅमिली प्लॅनिंग असोसिएशन ऑफ इंडिया सोलापूर शाखेची त्रैवार्षिक सर्वसाधारण सभा आणि शाखा सुकाणु समितीची निवडणूक रविवारी (दि. २६ जुलै) भवानी पेठ येथील मुख्य कार्यालयात पार पडली. प्रा. डॉ. श्रीकांत येळगावकर यांच्या अध्यक्षते- खाली झालेल्या या सभेत सन २०२६ ते २०२९ या तीन वर्षांच्या कालावधीसाठी डॉ. गौरी कहाते यांची सोलापूर शाखेच्या चेअरपर्सन (अध्यक्ष) पदी एकमताने निवड करण्यात आली.

या निवडणुकीसाठी निवडणूक अधिकारी म्हणून संस्थेच्या माजी अध्यक्षा डॉ. नभा काकडे आणि माजी उपाध्यक्ष रमणलाल सोनीमिंडे यांनी काम पाहिले.

नूतन कार्यकारिणी पुढीलप्रमाणे

चेअरपर्सन: डॉ. गौरी कहाते,

व्हाईस चेअरपर्सन: डॉ. राजीव प्रधान,

फायनान्स डव्हायझर: डॉ. आयेशा रंगरेज,

कार्यकारिणी सदस्य - डॉ. विजया महाजन, सपना चिट्टे, संगमेश्वर रघोजी,

युवा प्रतिनिधी: अनुश जिंदम, सृष्टी सर्वगोड, सेजल कांबळे.

७७ वा वर्धापन दिन व विविध उपक्रम

या सर्वसाधारण सभेत फॅमिली प्लॅनिंग असोसिएशन ऑफ इंडियाचा ७७ वा वर्धापन दिन उत्साहात साजरा करण्यात आला. या निमित्ताने संस्थेचे माजी अध्यक्ष, उपाध्यक्ष आणि ज्येष्ठ सदस्यांचा यथोचित सत्कार करण्यात आला. तसेच विशेष उल्लेखनीय कार्य, पुरस्कार आणि विविध उपलब्धी मिळवलेल्या सदस्यांचाही विशेष सन्मान करण्यात आला.

सभेदरम्यान डॉ. हर्षवर्धन जोशी व त्यांच्या टीमने उपस्थितांसाठी अत्यंत उपयुक्त अशा सी.पी. आर. आणि प्रथमोपचार विषयावर प्रात्यक्षिकांसह प्रशिक्षण दिले.

मुंबई मुख्यालयाकडून अभिनंदन

नवनिर्वाचित कार्यकारिणीचे फॅमिली प्लॅनिंग असोसिएशनच्या मुंबई मुख्यालयाच्या अध्यक्षा डॉ. रत्नमाला देसाई व डायरेक्टर जनरल डॉ. कल्पना आपटे यांनी विशेष अभिनंदन केले व पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या.

सभेच्या सुरुवातीला मावळते चेअरपर्सन प्रा. डॉ. एन. बी. तेली यांनी उपस्थितांचे स्वागत केले, सूत्रसंचालन शाखाधिकारी सुगतरत्न गायकवाड यांनी केले. तर आभार प्रा. डॉ. विजया महाजन यांनी मानले. या कार्यक्रमास पदाधिकारी, सदस्य व कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## भाळवणी येथील श्री विठ्ठल मंदिरात आषाढी एकादशी निमित्त महापुजा




**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पंढरपूर : पंढरपूर तालुक्यातील भाळ वणी येथील रविवार पेठेतील श्री विठ्ठल रुक्मिणी मंदिरात आषाढी एकादशी निमित्त शिवसेना (उबाटा)पंढरपूर उप तालुका प्रमुख प्रवीण शिंदे यांच्या हस्ते महापूजा करण्यात आली.

पहाटे उत्सव मूर्तीस अभिषेक करण्यात आला. त्यानंतर आरती करण्यात आली. यावेळी केळीचे वाटप करण्यात आले.

यावेळी आनंद देशपांडे, दादा आगलावे, जालिंदर शिंदे, उपसरपंच नितीन शिंदे, सुनील माने, सुधीर गांधी, अमोल लंगोटे, प्रशांत माळवदे, राजू बिडवे, पुरुषोत्तम शिंदे, राजू शिंदे, सदाशिव वाघमारे, मनोज गाजरे, दत्ता लोखंडे, सखाराम लोखंडे, दगडू शिंदे आदी महिला, भाविक भक्त मोठया संख्येने उपस्थित होते.

## बोरीवलीत एसआयआर जनजागृती अभियानाला नागरिकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद



**मतदार यादी विशेष पुनरीक्षणासाठी फॉर्म भरण्याचे आवाहन**

ठाणे प्रतिनिधी/मिलिंद जाधव : भारतीय निवडणूक आयोगाच्या वतीने राबविण्यात येत असलेल्या स्पेशल इंटेन्सिव्ह रिव्हिजन (SIR) अर्थात मतदार यादी विशेष पुनरीक्षण मोहिमेअंतर्गत भिवंडी तालुक्यातील बोरीवली ग्रामपंचायत हद्दीत जनजागृती अभियानाला वेग आला आहे. मतदार यादीतील माहिती अचूक व अद्ययावत ठेवण्यासाठी प्रत्येक पात्र मतदाराने आवश्यक फॉर्म भरून या मोहिमेत सहभागी व्हावे, असे आवाहन प्रशासनाच्या वतीने करण्यात आले आहे.

या मोहिमेंतर्गत बूथ लेव्हल अधिकारी (बीएलओ) घरोघरी भेट देऊन निवडणूक आयोगाने निर्धारित केलेले फॉर्म वितरित करीत असून, त्यामध्ये आवश्यक माहिती भरून घेतली जात आहे. फॉर्मवर पासपोर्ट आकाराचा छायाचित्र चिकटविणे तसेच मतदाराची स्वाक्षरी किंवा अंगठ्याचा ठसा देणे बंधनकारक असल्याची माहितीही नागरिकांना देण्यात येत आहे. बोरीवली ग्रामपंचायत हद्दीतील विविध प्रभागांमध्ये सामाजिक कार्यकर्ते ॲड. जियाद गुजर यांच्या मार्गदर्शनाखाली एसआयआर जनजागृती व फॉर्म भरणे शिबिराचे आयोजन करण्यात आले आहे. बोरीवली गावासाठी चार बीएलओंची नियुक्ती करण्यात आली असून, प्रभाग क्रमांक १७८ साठी शाहीन सिद्दीकी, प्रभाग क्रमांक १७९ साठी फिरोज खान, प्रभाग क्रमांक १८० साठी अंजुम बानो अन्सारी आणि प्रभाग क्रमांक १८१ साठी सईदा शेख यांच्याकडे जबाबदारी सोपविण्यात आली आहे. या मोहिमेचे पर्यवेक्षक म्हणून प्रकाश सोनावणे कार्यरत आहेत. सध्या गावातील विविध ठिकाणी एसआयआर फॉर्म भरण्याची प्रक्रिया सुरू असून, नागरिकांकडून त्याला चांगला प्रतिसाद मिळत आहे. या अभियानाच्या यशस्वी अंमलबजावणीसाठी बोरीवली ग्रामपंचायतीचे अधिकारी गणेश जाधव, सरपंच अन्वर पिंजारी तसेच सामाजिक कार्यकर्ते ॲड. जियाद गुजर यांचे विशेष सहकार्य लाभत आहे. याशिवाय ग्राम पंचायतीचे कर्मचारी शहबान पिंजारी, झाकीर शाह, अफझल खोत तसेच नागरिक अकबर अब्दुल्ला खोत, दिलीप दिवे, कमलेश जाधव, मुसद्दिक मुल्ला, अली हरे, कैस मलिक बार्डी, मसीह नाचन, साद कासकर, मुसाब नाचन, मुसाब खोत, साईम मुल्ला, नाझिया नाझीम बर्डी आणि सुफियान जावरे यांनीही या अभियानात सक्रिय सहभाग घेत नागरिकांना आवश्यक मार्गदर्शन केले. प्रशासनाच्या वतीने प्रत्येक मतदारापर्यंत एसआयआरचे फॉर्म पोहोचविण्यात आले असून, सर्व पात्र मतदारांनी आवश्यक कागदपत्रांसह आपले फॉर्म विहित मुदतीत भरून जमा करावेत. मतदार यादी अचूक, अद्ययावत आणि सर्वसमावेशक करण्यासाठी प्रत्येक नागरिकाने या विशेष पुनरीक्षण मोहिमेत सक्रिय सहभाग नोंदवावा, असे आवाहन निवडणूक प्रशासनाने केले आहे.

### महिनाभर शिधा संकलन, २५० युवकांची निस्वार्थ सेवा; पर्यावरणपूरक वारीचा अनोखा संदेश

# पडघा ग्रामस्थांची विठ्ठलसेवा; २१ हजार वारकऱ्यांसाठी अन्नछत्राचा आठ वर्षांचा अखंड संकल्प

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

ठाणे प्रतिनिधी/मिलिंद जाधव : विठ्ठलभक्ती, समाजसेवा आणि निस्वार्थ समर्पण यांचा सुंदर संगम अनुभवायचा असेल, तर भिवंडी तालुक्यातील पडघा व पडघा परिसरातील ग्रामस्थांचे 'वारी अन्नछत्र' हे त्याचे जिवंत उदाहरण ठरते. आषाढी वारीदरम्यान संत ज्ञानेश्वर महाराज पालखी मार्गावर एका दिवसासाठी तब्बल २१ हजार पाचशे वारकऱ्यांना महाप्रसाद देण्याची परंपरा पडघा व पडघा परिसर येथिल ग्रामस्थांनी गेल्या आठ वर्षांपासून अखंडपणे जपली आहे. या सेवेसाठी गावातील आणि परिसरातील सुमारे २५० युवक महिनाभर घराघरांत जाऊन शिधा व वर्गणी गोळा करतात. प्रत्येक नागरिक आपल्या इच्छेनुसार धान्य, किराणा किंवा आर्थिक मदत देतो. विशेष म्हणजे 'वारी अन्नछत्र मंडळ' या उपक्रमाला कोणताही अध्यक्ष, सचिव किंवा पदाधिकारी नाही. प्रत्येक सेवेकरी स्वतःला केवळ विठ्ठलाचा सेवक मानून जबाबदारी पार पाडतो. महाप्रसादासाठी लागणारा सर्व शिधा पालखी आगमनाच्या आदल्या दिवशी मोठ्या ट्रकमधून तालुक्यातील तोंडले, बोंडले या ठिकाणी सुरक्षित आणला जातो. चंद्रमोळी पेट्रोल पंपासमोरील परिसरात ग्रामस्थांच्या सहकार्याने भव्य अन्नछत्र उभारण्यात आले होते. येथे वारकऱ्यांना भात, वरण, मुगाच्या डाळीची उसळ आणि शिरा असा स्वादिष्ट महाप्रसाद प्रेमाने वाढला जातो.

महाप्रसादासोबत सेवाभावाचाही महोत्सव: महाप्रसादाबरोबरच सुमारे ३० हजार वारकऱ्यांना चहाचे मोफत वाटप केले जाते. तसेच पडघा येथील नाभिक समाजातील सेवेकरी सुमारे दीड हजार वारकऱ्यांची मोफत दाढी व केस कापण्याची सेवा देतात. त्यामुळे अन्नदानासोबतच समाजसेवेची अनोखी परंपरा येथे अनुभवायला मिळते.

स्वच्छता आणि पर्यावरणाचा आदर्श: अन्नछत्रात प्लास्टिकऐवजी पत्रावळींचा वापर करून पर्यावरणपूरक वारीचा संदेश दिला जातो. विशेष म्हणजे महाप्रसादानंतर उरलेल्या पत्रावळ्या व कचरा गोळा करून परिसर स्वच्छ करण्याची जबाबदारीही हेच २५० सेवेकरी पार पाडतात. त्यामुळे विठ्ठलसेवेसोबत स्वच्छता आणि पर्यावरण संवर्धनाचाही आदर्श समाजासमोर ठेवला जात आहे.

पडघा नाभिकांनी ९०० वारकऱ्यांना दिली सेवा: पडघा

नाभिक सेवेकऱ्यांनी तब्बल ९०० वारकरी भक्तांची मोफत सेवा केली. या सेवेमध्ये वारकऱ्यांची दाढी करणे व केस कापून देणे यांचा समावेश होता. या निस्वार्थ सेवेमुळे वारकऱ्यांना मोठा दिलासा मिळाला. अन्नदानाबरोबरच या सेवेमुळे समाजातील सेवाभाव, समर्पण आणि मानवतेचे दर्शन घडले.




पडघा ग्रामस्थांचे 'वारी अन्नछत्र' हे केवळ अन्नदानाचा उपक्रम नसून, निस्वार्थ सेवा, सामाजिक एकोप्याची भावना आणि विठ्ठलभक्तीचा प्रेरणादायी उत्सव असल्याचे पुन्हा एकदा सिद्ध झाले आहे.